# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि./म.वि./४६६/S/४६५

दिनांक:— ०१.०९.२००९

प्रति,

अध्यक्ष/सचिव
स्वर्गीय जगन्नाथ जत्तेवार शिक्षण संस्था, नागपूर
व्दारा— आयडीयास इंस्टीटयुट ऑफ डिझाईन एज्युकेशन
अॅड आर्कीटेक्चर स्टडीज, हुडकेश्वर रोड, नागपूर.

विषय :— सत्र २००९–१० पासून नवीन महाविद्यालयास प्रथम संलग्निकरण प्रदान करण्याबाबत.

संदर्भ :— शासन निर्णय क्र. टिईसी २००९/(२६/०९)/तांशि—४, दिनांक १५ जुन, २००९.

महोदय,

आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भांकित पत्रानूसार राज्य शासनाने आपल्या संस्थेला सत्र २००९–१० पासुन नवीन महाविद्यालय सुरु करण्यास दिलेल्या परवानगीनुसार व स्थानिय चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार व त्यास विद्यापीठाच्या विव्दत परिषदेने दिनांक ३१.०८.२००९ ला दिलेल्या मंजुरी नुसार म. वि. अधिनियम १९९४ च्या कलम ८३ अंतर्गत आपल्या नवीन महाविद्यालयाला सत्र २००९–१० पासून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन राहून प्रदान करण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव व ठिकाण | विद्याशाखा /अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| स्वर्गीय जगन्नाथ जत्तेवार शिक्षण संस्था, नागपूर | आयडीयास इंस्टीटयुट ऑफ डिझाईन एज्युकेशन अॅड आर्कीटेक्चर स्टडीज, हुडकेश्वर रोड, नागपूर. | १) बॅचलर ऑफ आर्कीटेक्चर<br>२) बॅचलर ऑफ आर्कीटेक्चर (इंटेरिअर डिझाईन) | ४० विद्यार्थी<br>४० विद्यार्थी |

प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन प्रदान करण्यात येत आहे

१. उपरोक्त नवीन महाविद्यालयाला देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण विद्यापीठाद्वारे गठीत स्थानिय चौकशी समितीने महाविद्यालयास भेट देऊन सादर केलेल्या अहवालात दर्शविलेल्या त्रृटी विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. (समितीच्या अहवालाची प्रत सोबत जोडलेली आहे.)
२. विद्यार्थी संख्येचे निकष शासन निर्णय क्र. एनजीसी—१०९३ /(५९१८)/मशि—३, दिनांक १९ जुन, १९९५ प्रमाणे महाविद्यालयावर बंधनकारक राहतील त्याचे उलंघ्न झाल्यास शासन निर्णय दि. २१.०१.२००६ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
३. विद्यापीठाने विहीत केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असुन इतर सर्व आवश्यक पायाभुत सोयी उपलब्ध करुन त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करुन विद्यापीठास तसे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.
४. उपरोक्त अभ्यासक्रमाची परवानगी प्राचार्य व नियमित शिक्षक भरण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. प्राचार्य व नियमित शिक्षकांची नियुक्ती न केल्यास विद्यार्थ्यांना दिलेले प्रवेश रद्द होतील.
५. उपरोक्त महाविद्यालय कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास आपले महाविद्यालय तयार असुन त्या आशयाचे हमीपत्र महाविद्यालयाने विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर यांना सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे.
६. नवीन महाविद्यालयाला प्रथम संलग्निकरण प्रदान केल्यानंतर अध्यापनाचे १८० दिवस महाविद्यालयाव्दारा पुर्ण करण्यात येतील अशा आशयाचे शपथपत्र रु. १०० /— च्या गैर न्यायिक मुद्रांकावर सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे.
७. प्रथम संलग्निकरण प्राप्त झाल्यानंतर ज्या महाविद्यालयांनी वरील नमुद विविध अटी व शर्तीची पुर्तता केली नाही अशा महाविद्यालयांना पुढील निरंतर संलग्निकरण देता येणार नाही व जर अशा महाविद्यालयानी पुढील सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया केली तर प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठ घेणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.
८. ज्या अभ्यासक्रमाचे अभ्यासक्रमीका, अध्यादेश विद्यापीठात तयार नाही असे अभ्यासक्रम/ विषय महाविद्यालयांनी सुरु करु नये.
९. कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस महाविद्यालय आर्थिकदृष्टया चालविणे शक्य व्हावे यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ/ शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या शुल्कानुसारच शुल्क आकारावे.
१०. निरंतर संलग्निकरणाचे आवेदनपत्र दि. ३०.०९.२००९ पर्यंत सादर करण्यात यावे.
११. महाविद्यालयाच्या बांधकामाचे मोजमाप करण्याकरीता अभियंता समिती महाविद्यालयाला भेट देऊन सादर केलेल्या अहवालाच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.
१२. वरील सर्व अटींची पुर्तता तसेच पुढील निरंतर संलग्निकरणाकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/ राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/ बार कौन्सिल ऑफ इंडिया इत्यादी शिखर संस्थांनी घालुन दिलेल्या अटींची पुर्तता विहीत कालावधीत संस्थेने न केल्यास पुढील संलग्निकरण स्थगित होईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची/ संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

कृपया कळावे.

आपला

( फु. ख. भगत )
सहायक कुलसचिव (म.वि.)

— २ —

प्रतिलिपी माहितीकरिता सादर:–

१. मा.संचालक उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे.

२. सहसंचालक, (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,नागपूर

३. मा.संचालक (म.वि.वि.म.)

४. मा.वित्त व लेखा अधिकारी.

५. मा.परिक्षा नियंत्रक,

६. उपकुलसचिव विद्या विभाग,

७. सहायक कुलसचिव, परिक्षा विभाग,गोपनिय विभाग,व्यावसायिक परिक्षा,परिक्षा व चौकशी

८. संबंधित लिपीक, शिक्षक मान्यता,

९. संबंधित लिपीक, संलग्निकरण शाखा

(३ ते ९ :) रा.तु.म.नागपूर विद्यापीठ,नागपूर.

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी.

C:\AFFILIATION 09-10\NEW COLLEGE AFFILIATION.doc